**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६८ दिनांक १८/०९/२०२३**

# आगामी श्री गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद साठी पालघर पोलीस दल सज्ज.

दि.१९/०९/२०२३ ते दि.२८/०९/२०२३ रोजी पावेतो श्रीगणेशोत्सव सण साजरा होत आहे. पालघर जिल्ह्यात श्री गणेशोत्सव सण मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो. त्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यात एकूण ९१५० खाजगी गणेश मुर्तीची तसेच २०१६ सार्वजनिक गणेश मुर्तीची स्थापना होणार आहे. सदर आगामी गणेशोत्सव सणाचे अनुषंगाने पालघर जिल्ह्यात कोणताही कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याकरीता पालघर पोलीसांकडून ०१ पोलीस अधीक्षक, ०१ अपर पोलीस अधीक्षक, ०५ उपविभागीय पोलीस अधिकारी, ८० पोलीस अधिकारी, ८५० एकुण पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड, ४१ वाहतुक अंमलदार, उप विभगीय पोलीस अधिकारी यांचे ०४ स्ट्रायकींग फोर्स- ४० अंमलदार, ०२ दंगल नियंत्रण पथक- ६० अंमलदार, ०१ जलद कृती दल- ३५ पोलीस अंमलदार, पोलीस अधीक्षक कार्यालय येथे रिझर्व्ह स्ट्रायकींग- ६२ पोलीस अंमलदार व ०२ राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या - ४७ पोलीस अंमलदार असा पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

तसेच दिनांक २९/०९/२०२३ रोजी ईद-ए-मिलाद सण साजरा होणार असून आगामी ईद-ए-मिलाद सणासाठी ०१ पोलीस अधीक्षक, ०१ अपर पोलीस अधीक्षक, ०५ उपविभागीय पोलीस अधिकारी, ८० पोलीस अधिकारी, ८५० एकुण पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड, ४१ वाहतुक अंमलदार, उप विभगीय पोलीस अधिकारी यांचे ०४ स्ट्रायकींग फोर्स- ४० अंमलदार, ०२ दंगल नियंत्रण पथक- ६० अंमलदार, ०१ जलद कृतीदल पथक- ३५ पोलीस अंमलदार, पोलीस अधीक्षक कार्यालय येथे रिझर्व्ह स्ट्रायकींग- ४५ पोलीस अंमलदार व ०२ राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या- ४७ पोलीस अंमलदार असा पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

तरी आगामी साजऱ्या होणाऱ्या श्रीगणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या निमित्ताने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व नागरीकांना शुभेच्छा दिल्या असून आगामी श्रीगणेशोत्सव व ईद-ए-मिलाद शांततेत साजरा करण्याचे आवाहन केले आहे.